# कॅटीन / भोजनालय / उपहारगृह निविदा

शिवा ट्रस्ट संचलित विविध जिल्हयांतील वेगवेगळया महाविदयालयांमध्ये प्रवेशित झालेल्या विदयार्थ्यासाठी तसेच तेथील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी महाविदयालयाच्या आवारामध्ये भोजनालय ११ महिन्यांच्या करारे भाडे तत्वावर चालविण्यासाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

सदरील निविदा फॉर्म तसेच अटी व शर्ती बाबतचे परिशिष्ट संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा फॉर्म जमा करतांना शिवा ट्रस्ट, औरंगाबाद या नावाने धनाकर्ष / डि.डि. रक्कम रू. २०००/-(विना परतावा) ही अनामत रक्कम भरल्याशिवाय निविदा फॉर्मचा विचार केला जाणार नाही.

भोजनालय चालविण्यासाठी कार्यालयाने घालून दिलेल्या अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहतील. सदरील अटी व शर्ती प्रपत्रासोबत उपलब्ध उपलब्ध होतील. सदरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदा धारकाचे हमीपत्र स्वतःच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह असावे.

१) मोहोरबंध तांत्रिक लिफाफा क्र.१ व २ मध्ये खालील दिलेले कागदपत्र असणे आवश्यक असून जोडणे अनिवार्य आहे.

अ) शॉप ॲक्ट लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे.)

ब) फुड ॲण्ड ड्रग्ज लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)

क) इन्कम टॅक्स विवरणपत्र (मागील तीन वर्षाचे)

ड) भोजनालय व उपहारगृह चालविण्याबाबतचे अनुभव (शासकीय किंवा खाजगी) प्रमाणपत्र

असल्यास प्राधान्य

इ) पॅन कॉर्ड

ई) पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)

उ) जी.एस.टी. प्रमाणपत्र

सदरील मोहोरबंध निविदा तांत्रिक लिफाफा क्र.१ व २ हा दिनांक ३०/११/२०२३ पर्यत समक्ष किंवा पोस्टाने शिवा ट्रस्ट मुख्यालयाच्या आवक शाखेत जमा करण्यात यावे. तसेच मदर निविदा उघडण्याची तारीख आपणांस कळविण्यात येईल. सदर निविदा ही मा. अध्यक्ष, शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांचे दालनात उघडण्यात येईल, त्याचप्रमाणे तांत्रिक लिफाफयाची पुर्तता पुर्ण करणाऱ्या पुरेशा निविदा धारकांची लिफाफा क्र. उघडण्याची कार्यवाही भोजनालय समिती ठरवेल त्यावेळी उघडण्यात येईल.

निविदा स्विकारण्याचे अगर नाकारण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांनी राखुन ठेवलेले आहेत.

# निविदा प्रपत्र/अर्ज

श्री/श्रीमती ........................................................................ आपणांस विनंतीपुर्वक निविदा सादर करु इच्छितो/इच्छिते की, शिवा ट्रस्ट संचलित विविध जिल्हयांतील विविध महाविदयालयांमध्ये प्रवेशित झालेलया विदयार्थ्यांसाठी / महाविदलयातील कर्मचाऱ्यांसाठी भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी निविदा प्रपत्र सादर करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **संपूर्ण नांव** | : | |
| २. | **अ) संपुर्ण स्थानिक पत्ता (संपर्कासाठी पत्ता)** | : | |
| | **ब) कायम वास्तव्य असलेला पत्ता** | | |
| ३. | **सध्या करीत असलेला व्यवसाय सरकारी अथवा खाजगी तत्वावर असल्यास नोंदणी क्रमांकासह सविस्तर माहिती द्यावी.** | | |
| ४. | **आपणांस ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तिंच्या स्वाक्षऱ्या (शिक्क्याची सही) स्विकारली जाणार नाही.** | | १) संपुर्ण नांव:-<br>पत्ता :-<br>सही व दुरध्वनी क्रमांक :<br>२) संपुर्ण नांव:-<br>पत्ता :-<br>सही व दुरध्वनी क्रमांक : |
| ५. | **या निविदा फॉर्म सोबत मी चौकटीत (√) अशी खुण केलेली कागदपत्रे जोडलेली आहे.**<br>अ) शॉप ॲक्ट लायसन्य (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | केलेले असावे )<br>ब) फुड ॲण्ड ड्रग्ज लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)<br>क) इन्कम टॅक्स विवरणपत्र (मागील तीन वर्षाचे)<br>ड) भोजनालय व उपहारगृह चालविण्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र (शासकीय किंवा खाजगी) असल्यास प्राधान्य<br>इ) पॅन कॉर्ड<br>ई) पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)<br>उ) जी.एस.टी. प्रमाणपत्र | | |

मी असे लिहून देतो / देते की, आपल्या परिशिष्ट मधील सर्व अटी व शर्ती मी वाचलेल्या आहेत व त्या मला मान्य असून बंधनकारक आहेत.

निविदा धारकाची स्वाक्षरी :

निविदा धारकाचे संपूर्ण नाव :

# शिवा ट्रस्ट, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

## अटी व शर्ती बाबतचे परिशिष्ट

शिवा ट्रस्ट संस्थेअंतर्गत विविध जिल्हयांमध्ये सुरू असलेल्या महाविदयालयातील प्रवेशित विदयार्थ्यासाठी महाविदयालयाच्या आवारात भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १. | सदर भोजनालय व उपहारगृह हे फक्त या महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विदयार्थी / विद्यार्थीनी व तेथील महाविदयालयातील कर्मचाऱ्यांसाठी चालवावयाचे आहे. |
| २. | भोजनालय व उपहारगृहासाठी वापरण्यात येणार खाद्यपदार्थ, सर्व प्रकारच्या भाजी, डाळी, कडधान्ये, तेल, तुप व इतर खाद्यपदार्थ उत्तम प्रतीची असावीत. भोजनालय ब उपहारगृहात चांगल्या प्रतीचे भोजन तयार करावे. तो अधिकाऱ्यांकडून अचानकपणे तपासला जाईल. भोजनाच्या पदार्थाचा दर्जा व गुणवत्तेच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जोईल. |
| ३. | भोजनालय व उपहारगृहासाठी या कार्यालयाकडून फक्त जागा उपलब्ध करून दिली जाईल. काही किरकोळ बदल करावयाचे असल्यास कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील. |
| ४. | भोजनालय हे दुपारचे जेवणासाठी दु. १२.०० ते ०३.०० या वेळेत सुरु ठेवावे आणि रात्रीचे जेवणसाठी रात्री ०७.०० ते १०.३० पर्यंत सुरु ठेवावे. तसेच उपहारगृह हे सकाळी ०७.०० ते १०.०० व दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत सुरु ठेवावे. |
| ५. | भोजनालय व उपहारगृहाची सुरक्षा व्यवस्था ही भोजनालय चालकाने स्वतः ठेवावी. |
| ६. | भोजनालय व उपहारगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियमित किमान ३ महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी करून त्याचा अहवाल वेळोवेळी प्रशासनास सादर करणे बंधनकारक आहे. |
| ७. | भोजनालय व उपहारगृहात बसण्यासाठीची व्यवस्था उदा. टेबल, खुर्ची व इतर फर्निचर भोजनालय चालकाने स्वतः करावी. |
| ८. | भोजनालय व उपहारगृहासाठी लागणारी विद्युत पुरवठा कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिली जाईल. परंतु भोजनालय चालकाला वापरलेल्या विजेचा खर्च हा सबमीटरप्रमाणे या कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेपर्यंत/तत्पूर्वी भरणा करावा लागेल. विज बाल उशिराने भरल्यास त्याम नियमाप्रमाणे दंड आकारला जाईल |
| ९. | भोजनालय व उपहारगृहासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे देयक आपणास कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेपर्यंत तत्पूर्वी भरणा करावा लागेल. |
| १०. | भोजनालय व उपहारगृहासाठी तयार केलेले अन्न / खाद्यपदार्थ हे उघडे ठेवण्यात येऊ नयेत व पदार्थांचा दर्जा व गुणवत्ता राखणे तसेच स्वच्छता राखण्याची जबाबदारी भोजनालय चालकावर बंधनकारक आहे. |
| ११. | भोजनालय व उपहारगृहासाठी लागणारी सर्व प्रकारची भांडी, गॅस तसेच इतर साहित्य आणण्याची जबाबदारी भोजनालय चालकावरच राहील. |
| १२. | भोजनालय व उपहारगृह चालवितांना आपणांस भोजनालयामध्ये अग्निशामक उपकरणे स्वखर्चाने ठेवावी व हाताळावी लागतील. |

| | |
|---|---|
| १३. | आपण चालविणार असलेले भोजनालय हे अन्न व औषध प्रशासन विभागाने घालून दिलेल्या प्रमाणकानुसार असावे. |
| १४. | भोजनालय व उपहारगृहात काम करणारे कामगार ठेवणे व त्यांचा पगार देणे यात्री सर्वस्वी जबाबदारी भोजनालय चालकाची राहील. कामगाराचे वय १८ वर्ष व त्यापेक्षा जास्त असावे. कमी वयाचे अथवा बाल कामगार असू नयेत. |
| १५. | भोजनालय व उपहारगृहातून विदयार्थ्यीसाठा तसेच महाविदयालयातील कर्मचाऱ्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थाचे उधारीचे पैसे वसूल करण्याची जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. |
| १६. | आपणांस सदरचे भोजनालयाच्या इमारतीमध्ये पोट भाडेकरू ठेवता येणार नाही. |
| १७. | आपणांस सदरचे भोजनालयाचे हस्तांतरण इतरांना करता येणार नाही. |
| १८. | आपल्या भोजनालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे छायाचित्र, निवास पत्ता संपर्क क्रमांक या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. |
| १९. | भोजनालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत काही तक्रारी असल्याम परस्पर कार्यवाही न करता शिवा ट्रस्ट मुख्य कार्यालय, छत्रपती संभाजीनगर किंवा अध्यक्ष, शिवा ट्रस्ट, औरंगाबाद किंवा प्रशासकीय अधिकारी यांचेकडे तोडी / लेखी स्वरुपात तक्रार करावी. |
| २०. | भोजनालय व उपहारगृह चालकास रु. २५०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतकी अनामत रक्कम म्हणून ठेवावी लागेल व त्याची पावती रोखपाल यांचेकडे प्राप्त करुन घ्यावी. ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत आपणाकडून इमारतीचे नुकसान आल्यास तोडफोड आल्यास किंवा आपणाकडे काही येणे बाकी असल्यास सदरील अनामत रकमेतून ते वसूल करण्यात येईल. कराराची मुदत संपण्यापुर्वी भोजनालय व उपहारगृह बंद केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| २१. | भोजनालय चालकास रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर ११ महिन्याचा करारनामा करुन दयावा लागेल, ११ महिन्याच्या कालावधीनंतर हा करारनामा आपोआप संपुष्टात येईल. |
| २२. | खाद्यपदार्थीचा दर्जा समाधानकारक असल्यास स्वच्छता व इतर बाबींची पुर्तता केल्यास ११ महिन्याचा कालावधी पुढे चालू ठेवण्याचा अधिकार अध्यक्ष, शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांनी राखून ठेवलेला आहे. |
| २३. | भोजनालय व उपहारगृह कोणत्याही क्षणी बंद करणे किंवा कोणतेही कारण न देता करार रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यानी राखून ठेवलेले आहेत. |
| २४. | निविदा फॉर्म सोबत डि.डि.रु.२०००/- मात्र निविदा अनामत रक्कम भरावी लागेल, (ना परतावा) |
| २५. | भोजनालयातील कर्मचाऱ्यांची वेळोवेळी शारीरिक तपासणी करुन घ्यावी, अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमाणपत्र शॉप ॲक्ट लायसन्स भोजनालय व उपहारगृह चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र संस्था नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| २६. | भोजनालय व उपहारगृहात आहार पुरवितांना उत्तम दर्जा राखणे अन्नातून विषबाधा झाल्यास किंवा जिवितहानी अपाय झाल्यास त्यास संबंधित भोजनालय चालक जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. |
| २७. | भोजनालय व उपहारगृहात कोणतीही दुर्घटना झाल्यास व भोजनालयातील कर्मचाऱ्याम दुखापत/मृत्यु झाल्यास सदरची नुकसान भरपाई / मोबदला देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. त्याच प्रमाणे सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी अथवा वाद निर्माण |

| | |
|---|---|
| | झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी भोजनालय चालकाची राहील. त्या अनुषंगाने नियमानुमार भोजनालयात कार्यरत सर्व कर्मचारी यांची योग्य ते इन्सुरन्स (विमा) जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील याबाबत शिवा ट्रस्ट, औरंगाबाद कोणतीही जबाबदारी घेणार नाही याची नोंद घ्यावी. |
| २८. | निविदेमध्ये जो आहार जाहिर करण्यात आलेला आहे. तोच आहार देणे बाबत निविदाधारकाने दक्षता घ्यावी. |

**अध्यक्ष,**

**शिवा ट्रस्ट, औरंगाबाद**

वरिल प्रमाणे निविदा प्रपत्रातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून तया माझ्यावर बंधनकारक राहतील. त्याबाबत मी खालील स्वाक्षरी करून सादर करीत आहे.

निविदा धारकाची स्वाक्षरी, नांव व पत्ता ः-

दिनांकः-

## भोजनालय व उपहारगृहाच्या जागेबद्दल दरमहा भरावयाचे भाडे

मी/श्रीमती. ........................................................................................ आपणांस विनंतीपूर्वक सादर करू इच्छिते/इच्छितो की, शिवा ट्रस्ट संचलित विविध जिल्हयांतील विविध महाविदयालय येथील आवारातील असलेल्या इमारतीमध्ये महाविद्यालयात प्रवेशित विदयार्थ्यासाठी / महाविदयालयातील कर्मचाऱ्यांसाठी भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी निविदा प्रपत्र सादर करीत आहे.

१) संपूर्ण नांव :- ..........................................................................

२) संपुर्ण स्थानिक पत्ता :- ..........................................................................

३) संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक :- १) ..............................................................

२) ..............................................................

शिवा ट्रस्ट संचलित विविध जिल्हयांतील विविध महाविदयालयांच्या आवारातील असलेल्या इमारत येथे उपलब्ध करून दिलेल्या जागेच्या मोबदल्यात मी शिवा ट्रस्ट, औरंगाबाद या संस्थेचे खालील प्रमाणे भाडे दरमहा भरण्यास तयार आहे.

**जागेबद्दलचे भाडे दरमहा रुपये :-**

**(अक्षरी रुपये- )**

मी असे लिहून देतो/दते की, वरील प्रमाणे मी लिहून दिलेले दरमहाचे जागेचे भाडे किंवा शिवा ट्रस्ट, औरंगाबाद संस्थेने ठरवून दिलेले भाडे यापैकी जे अधिक असेल ते मी दरमहा कार्यालयाच्या रोखपाल शाखेत भरण्यास बांधिल राहील. दरमहाचे भाडे थकल्यास किंवा न भरल्याम भोजनालय व उपहारगृह अधिष्ठाता किंवा त्यांचे प्रतिनिधी तात्काळ बंद करतील याची मला जाणीव आहे.

निविदा धारकाची स्वाक्षरी : ............................................................

निविदा धारकाचे संपूर्ण नांव : ............................................................

**(सुचना हे प्रपत्र पूर्ण भरून लिफाफा क्र. २ मध्ये सिलबंद करून टाकावे)**

**भोजनालयात पुरविण्यात येणारे दुपारचे व रात्रीचे जेवणाचे दर खालीलप्रमाणे**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **जेवणातील पदार्थ** | **दर** |
|---|---|---|---|
| १. | दुपारचे जेवण | वरण / दाळ, भात, चपाती/पोळी सुकी भाजी, पातळ भाजी, दही, पापड, लोणचं, कांदा/मुळा, टोमॅटो / गाजर, लिंबू, मीठ | |
| २. | रात्रीचे जेवण | वरण / दाळ, भात, चपाती/पोळी सुकी भाजी, पातळ भाजी, दही, पापड, लोणचं, कांदा/मुळा, टोमॅटो / गाजर, लिंबू, मीठ | |

**टिप:-** **१**) दर रविवारी शाकाहारी जेवण करणाऱ्यांना रोजच्या जेवणा व्यतिरिक्त स्वीट देणे.

२) दर रविवारी मांसाहारी जेवण करणाऱ्यांना मटन / चिकन / अंडाकरी थाळी देणे.

**(सूचना हे प्रपत्र पुर्ण भरून लिफाफा क्र. २ मध्ये सिलबंद करून टाकावे)**

# विद्यार्थ्यांकरीता उपहारगृहात पुरविण्यात येणारे

# खाद्यपदार्थांचे दर खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदार्थाचे नांव | दर | |
|---|---|---|---|
| | | रुपये | पैसे |
| १. | मिसळ प्लेट पावसह | | |
| २. | बटाटे वडा २ नग सांबरसह | | |
| ३. | मेंदुवडा २ नग सांबरसह | | |
| ४. | इडली २ नग सांबरसह | | |
| ५. | समोसा १ नग | | |
| ६. | कचोरी १ नग | | |
| ७. | खमंग ढोकळा प्लेट (२५० ग्रॅम) | | |
| ८. | सिंगल अंडा आमलेट प्लेट (पावसह) | | |
| ९. | डबल अंडा आमलेट प्लेट (पावसह) | | |
| १०. | सिंगल अंडा भुर्जी (पावसह) | | |
| ११. | पोहे प्लेट ( २५० ग्रॅम) | | |
| १२. | आलु पराठा १ नग (२५० ग्रॅम) | | |
| १३. | चहा साधा | | |
| १४. | चहा (स्पेशल) | | |
| १५. | कॉफी (साधी) | | |
| १६. | नेसकॉफी | | |
| १७. | गरम दुध १ ग्लास (साखरेसह ) | | |
| १८. | बॉर्नव्हिटा दुध | | |
| १९. | साबुदाणा १ प्लेट | | |
| २०. | शिरा / उपमा १ प्लेट | | |
| २१. | चना उसळ १ प्लेट | | |
| २२. | उकळलेली अंडी ०२ नग | | |
| २३. | वेज पुलाव हाफ | | |
| २४. | वेज पुलाव फुल | | |

**अध्यक्ष,**

**शिवा ट्रस्ट, औरंगाबाद**

# जाहिरात

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून शिवा ट्रस्ट अंतर्गत असलेल्या विविध जिल्हयांतील महाविदलयांमध्ये प्रवेशित झालेल्या विदयार्थ्यांना भोजनालय व उपहारगृहाची सोय उपलब्ध करुन देणेकामी संस्थास्तरावर भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तरी ज्या इच्छुक निविदाधारकांना भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा अर्ज करावयाचा असेल त्यांनी संस्थेच्या संकेतस्थळावर पहावे. संस्थेच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

निविदा फॉर्म **शिवा ट्रस्ट मुख्यालय, ३रा मजला, सानिया चेंबर्स, सेव्हनहिल्स उड्डाणपुलाजवळ, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)** येथे जमा करावयाचे आहे.

निविदा समक्ष किंवा पोस्टाने पाठवु शकतात.